**५. नवीन इमारत उभारणे, इत्यादीसंबंधी आयुक्तास नोटीस देणे.–**

(१) कोणतीही नवीन इमारत उभारण्यात येईल किंवा कोणतीही इमारत पुन्हा बांधण्यात येईल किंवा वाढवण्यात येईल किंवा जी कोणतीही इमारत रिकामी असेल अशा इमारतीचा पुन्हा भोगवटा करण्यात येईल तेव्हा, [२][किंवा संपूर्ण इमारत किंवा इमारतीच्या भागांमधील वापरकर्त्यांमध्ये बदल करण्यात येईल तेव्हा,] त्या इमारतीवर आकारण्यात आलेले मालमत्ता कर देण्यास प्रथमतः पात्र असलेल्या व्यक्तीने पंधरा दिवसांच्या आत आयुक्तास त्यासंबंधी लेखी नोटीस दिली पाहिजे.

(२) उक्त पंधरा दिवसांचा कालावधी हा नव्याने उभारण्यात आलेली किंवा पुन्हा बांधण्यात आलेली इमारत, यथास्थिती, पुरी होणे किंवा तिचा भोगवटा करणे यांपैकी जी गोष्ट प्रथम घडेल ती गोष्ट घडल्याच्या तारखेपासून किंवा इमारत वाढवल्याच्या तारखेपासून आणि जी इमारत रिकामी असेल त्या इमारतीच्या बाबतीत, तिचा पुन्हा भोगवटा करण्यात आल्याच्या तारखेपासून [३][आणि संपूर्ण इमारत किंवा इमारतीच्या भागामधील वापरकर्त्यांच्या बदलाच्या प्रकरणामध्ये वापरकर्त्यांच्या अशा बदलांच्या दिनांकापासून] मोजण्यात आला पाहिजे.

**६. इमारत पाडून किंवा काढून टाकल्यासंबंधी आयुक्ततास नोटीस देणे.–**

(१) आयुक्ताच्या आदेशानुसार असेल त्याव्यतिरिक्त अन्यथा मालमत्ता करास पात्र असलेली कोणतीही इमारत किंवा तिचा कोणताही भाग पाडून किंवा काढून टाकण्यात येईल, तेव्हा उक्तत कर देण्यास प्रथमतः पात्र असलेल्या व्यक्तीने आयुक्तास, त्यासंबंधी लेखी नोटीस दिली पाहिजे.

(२) अशी नोटीस देण्यात येईपर्यंत पूर्वोक्त व्यक्ती, अशी इमारत किंवा तिचा कोणताही भाग पाडून किंवा काढून टाकण्यात आला नसता तर ती व्यक्ती, अशा इमारतीच्या बाबतीत जो मालमत्ता कर देण्यास दायी झाली असती असा प्रत्येक मालमत्ता कर देण्यास, दायी असल्याचे चालू राहील:

परंतु या नियमातील कोणताही मजकूर, जी इमारत किंवा इमारतीचा जो भाग पडला असेल किंवा जळून गेला असेल त्या इमारतीच्या बाबतीत किंवा इमारतीच्या त्या भागाच्या बाबतीत लागू होणार नाही.

---

१. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २२ अन्वये "भारतीय" हा शब्द वगळण्यात आला.

२. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २३(१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २३(२) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.